ज्ञापन

ग्रामपंचायत शहरटाकळी, ता. शेवगाव येथील कार्यालयीन कामकाजामध्ये हलगर्जीपणा केल्याबाबत. ( श्री गर्जे सुभाष बाजीराव, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत शहरटाकळी,ता.शेवगाव)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
ग्रामपंचायत विभाग
आदेश जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ ३२४ /२०२६
दिनांक २५/०५/२०२६

संदर्भ- १. दिनांक १०.१२.२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.अहिल्यानगर यांनी ग्रामपंचायत शहरटाकळी, ता.शेवगाव येथे दिलेली भेट
२. कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०२/२०२५, दि.११/१२/२०२५
३. गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांचे पत्र क्र. आस्था-२/६५३/२०२५ दि.२३/१२/२०२५
४. या कार्यालयाकडील पुन:स्थापित आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३१/२०२६,दि.१९.०१.२०२६.
५.या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/१८५/२०२६,दि.१८/०५/२०२६.
६. गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/६८०/२६, दि.२०/५/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये श्री.सुभाष बाजीराव गर्जे हे ग्रामपंचायत शहरटाकळी,ता.शेवगाव येथे ग्रामपंचायत अधिकारी या पदावर कार्यरत असताना ग्रामपंचायत कार्यालयीन कामी पुर्णवेळ उपस्थित न राहणे, कर आकारणी व कर वसुली मध्ये अक्ष्यम्य दुर्लक्ष असणे, ग्रामपंचायत अभिलेखे अपुर्ण असणे तसेच मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानामध्ये असमाधानकारक कामकाज असणे याबाबी संदर्भ क्र.१ अन्वये दिलेल्या भेटीमध्ये दिसुन आलेल्या होत्या. त्यामुळे श्री गर्जे यांना संदर्भ क्र.२ च्या आदेशानुसार जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबित करण्यात आले होते.

तथापि, संदर्भ क्र. ३ अन्वये गटविकास अधिकारी यांचा अहवाल प्राप्त आला असून सदर अहवालात गटविकास अधिकारी यांनी 'श्री.गर्जे यांनी यांचे ग्रामपंचायत न.नं.१ ते ३३ हे अद्यावत करण्यात आलेले असून त्या अनुषंगाने असणारे सर्व अभिलेखे समाधानकारक अद्यावत करण्यात आलेले आहेत. तसेच मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत कामाचा आढावा घेतला असता व पाहणी केली असता काम समाधानकारक सुरु असल्याचे खात्री करण्यात आलेली आहे.' असे नमूद केलेले आहे. गटविकास अधिकारी यांनी सादर केलेला अहवाल संयुक्तिक तसेच समाधानकारक असल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार श्री.गर्जे याना संदर्भ क्र.४ अन्वये पंचायत समिती नेवासा येथे पुनःस्थापित करण्यात आलेले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र.५ अन्वये श्री.सुभाष बाजीराव गर्जे यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.६ अन्वये श्री.सुभाष बाजीराव गर्जे यांच्या प्राप्त खुलाशानुसार श्री.सुभाष बाजीराव गर्जे यांच्याकडून ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजामध्ये हलगर्जीपणा झाला होता. परंतु त्यामध्ये श्री .सुभाष बाजीराव गर्जे यांनी सुधारणा केली आहे. यापुढील काळात ते त्यांचे काम अतिशय प्रामाणिकपणे, सचोटीने करतील. तरी दिलेला खुलासा मान्य करुन भविष्यात श्री.सुभाष बाजीराव गर्जे यांचेकडुन अशा प्रकारे हलगर्जीपणा होणार नाही म्हणुन श्री.सुभाष बाजीराव गर्जे यांना सक्त ताकीद देणेत येत आहे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०४२४०६००६५ असा आहे.

आनंद भंडारी,(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री.सुभाष बाजीराव गर्जे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती नेवासा
द्वारा गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा
२/-सदरचे ज्ञापन संबंधितास बजावून ज्ञापन बाजावलेची पोहोच या कार्यालयास सादर करावी.